॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**

**बातमी क्र.1**

जळगाव दि. 20 ( ) पंतप्रधान यांनी सुरु केलेल्या स्वच्छ भारत अभियानातंर्गत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या उपक्रमात वैयक्तिक पातळीवर व्यवस्थापन परिषद सदस्यांनी सक्रीय सहभाग घेणार असल्याचा निर्धार व्यक्त केला.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि.20 जून रोजी व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात येवून मान्यता देण्यात आली. कुलगुरु प्रा.पाटील यांनी या बैठकीत विद्यापीठाकडून स्वच्छता अभियानातंर्गत सुरु असलेल्या उपक्रमाव्यतिरिक्त सदस्यांनी वैयक्तिक पातळीवर देखील योगदान द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. त्याला सर्व सदस्यांनी सहमती दर्शवून या अभियानात आपल्या परीने सक्रीय सहभाग देणार असल्याचे सांगितले व तसा अहवाल हे सदस्य लवकरच कुलगुरुंना सादर करणार आहेत.

आजच्या बैठकीत विद्यापीठाने निकाल मुदतीच्या आत लावल्याबद्दल कुलगुरु, प्र-कुलगुरु, उत्तरपत्रिका तपासणारे सर्व प्राध्यापक व परीक्षा विभागातील अधिकारी - कर्मचारी यांचे सदस्यांनी अभिनंदन केले. प्राचार्य एल.पी.देशमुख यांनी मांडलेल्या अभिनंदनाच्या ठरावाला प्रा.एस.टी.इंगळे यांनी अनुमोदन दिले. बैठकीत विद्या परिषदेतून व्यवस्थापन परिषदेवर निवडून आलेल्या प्रा.जे.बी.नाईक व प्रा.प्रिती अग्रवाल यांचे कुलगुरुंच्या हस्ते स्वागत करण्यात आले. प्रा.नितीन बारी यांनी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. दीपक पाटील यांनी अनुमोदन दिले. विद्यापीठ परिसरात कर्मचाऱ्यांनी श्रमदानातून चाऱ्या खोदण्याचे काम व वृक्षारोपण केल्याबद्दल त्यांच्यांही अभिनंदनाचा ठराव मंजूर झाला. आव्हान 2018 चान्सलर ब्रिगेड आपत्तकालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या डॉ.पंचशिला वाघमारे (मुक्ताईनगर ) व प्रा.हेमंत जोशी (धुळे) यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट संघव्यवस्थापक म्हणून पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचेही यावेळी अभिनंदन करण्यात आले.

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle
**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**



**बातमी क्र.2**

जळगाव. दि.20 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त गुरुवार दि.21 जून रोजी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांसाठी योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे.

योग दिन प्रात्यक्षिक घेण्याविषयी मानव संसाधन विकास मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली , मा.राज्यपाल तसेच उच्च तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार 21 जून या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या दिवशी सकाळी 7.00 ते 8.00 या वेळेत शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यापीठ परिसरात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांसाठी पदवीप्रदान सभागृहात योग शिक्षकांकडून प्रात्यक्षिक घेतले जाणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव भ.भा.पाटील यांनी केले आहे.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : २० जून, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**
कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी